# चीन – कोविद

## पुरन्दरे चन्द्रशेखर

कोविदची सुरुवात डिसेंबर २०१९ ला चीनमध्ये झाली. सरकारने तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली. [*आंदोलन, मार्च २०२०*]. प्रामुख्याने लोकांच्या येण्याजाण्यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली. शहरे,पेठा, वस्त्या बंद करण्यात आल्या. घराबाहेर पडणे मुश्किल. लसीकरण, कोविदची काटेकोर तपासणी, नव्या प्रचंड छावण्यात बाधितांना भरती, वगैरे. चीनच्या दमनकारी व्यवस्थेत या प्रकारचा कडक बंदोबस्त शक्य होतो. त्यासाठी राज्यकर्त्या (एकमेव) कम्युनिस्ट पक्षाचे दोन हात – एक अगदी तळागाळापर्यंत असणारे पक्षाचे कार्यकर्ते, दोन – विराट शिस्तबद्ध नोकरशाही. त्यांनी मिळून ही फट नसणारी तटबंदी केली. ही zero-covid पॉलिसी. तेव्हा तिचा गौरव सरकारी माध्यमांनी केला. पश्चिमेतील, विशेषत: अमेरिकेतील प्रचंड बळींची संख्या (११ लाख) पहाता चीनमधील संख्या कमी होती किंवा कमी दाखवली गेली. पाश्चात्य लोकशाहीपेक्षा आपली व्यवस्था श्रेष्ठ हा मुद्दा.

पण लोकांचे दैनंदिन जीवनच ठप्प झाले. मानसिक विकारही वाढू लागले. उंच इमारतींवरून उड्या मारून काहींनी आत्महत्या केल्या. शेवटी तीन वर्षे ही जाचक सक्ती सहन केल्यानंतर लोकांचे निषेध सुरू झाले. चीनमध्ये सरकारविरुद्ध रस्त्यावर येणे म्हणजे तुरुंगवासाला आमंत्रण. तरीही लोक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर आले. प्रसंगी मतदान, भाषणस्वातंत्र्य अशा मागण्याही झाल्या.

लोकांचे हाल हा एक भाग झाला. दुसरा म्हणजे, चिनी अर्थव्यवस्थेवर zero-covid पॉलिसीचे अनिष्ट परिणाम होऊ लागले. दळणवळण बंद, बाधित लोक कामावर न येणे, त्यांची व इतरांची स्थानबद्धता, त्यामुळे पुरवठा–उत्पादन–वितरण यात खंड इत्यादी कारणांनी अनेक व्यवसाय बंद पडले. परदेशी निर्यात व गुंतवणूक आटली. चीनची आर्थिक वाढ मागच्या वर्षी ३ टक्केहून कमी झाली असावी असा अंदाज आहे. '७० च्या दशकानंतर ही सगळ्यात कमी वाढ आहे. गेल्या दीड वर्षात सुमारे १ ट्रिलियन डॉलर्स इतके राष्ट्रीय उत्पन्न कमी झाले. (एक ट्रिलियन म्हणजे एकावर बारा शून्ये.)

जनक्षोभापेक्षा या आर्थिक घसरणीने सरकारने अचानक zero - covid पॉलिसी ७ डिसेंबरला मागे घेतली असावी. लोकांना न जुमानता आपले धोरण दडपशाहीने त्यांच्यावर लादण्याची चिनी सरकारची परंपरा आहे. तेथे ना विरोधी पक्ष, ना निष्पक्ष मीडिया, ना स्वतंत्र न्यायसंस्था. पण जागतिक महासता हे स्थान zero-covid पॉलिसीने धोक्यात येऊ लागले.

हे धोरण अकस्मात रद्द करण्याचे अनेक गंभीर परिणाम उद्भवतात. त्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कोट्यवधी लोकांचे आयुष्य धोक्यात येणे. त्यापुढे व्यापार–उदीम, देशाची अर्थव्यवस्था सुधारणे हे मुद्दे दुय्यम ठरतात. म्हणून तो मुद्दा प्रथम पाहू.

जगातील इतर देशांनीही कोविदचे निर्बंध रद्द केले पण ते असे रातोरात रद्द केले नाहीत. त्याआधी संसर्ग वाढलाच तर काय करायचे याची शक्य तेवढी पूर्वतयारी केली. म्हणजे, औषधांचा पुरेसा साठा, वैद्यकीय कर्मचाऱ्यांची हजेरी, हॉस्पिटल्समध्ये जागा उपलब्ध, ICU, वगैरे. चीनने यातील काहीच पूर्वतयारी न करता अचानक निर्बंध उठवले. सक्तीच्या टेस्ट्स, क्वारंटाईन, अंतर्गत प्रवासावरील बंदी, whatspp वर लस घेतल्याचा पुरावा इत्यादि गोष्टी रद्द झाल्या. त्यामुळे कोविदचा प्रसार एकदम अतोनात वाढला आहे.

भारतातल्यासारखीच चीनमध्ये शहरी–ग्रामीण तफावत प्रचंड आहे. आरोग्यसेवा ग्रामीण भागात कोविदसारख्या दुखण्याला सामोरी जायला पूर्ण अक्षम आहे. चिनी पंचांगानुसार चांद्रवर्षाची सुरुवात हा वर्षातील सगळ्यात मोठा सण असतो. त्यासाठी शहरात काम करणारे कोट्यवधी कामगार आपापल्या गावाला जातात. या प्रवासात कोविद निर्बंध काळात खंड पडला होता, आता २२ जानेवारीला सुरू झालेल्या नववर्षासाठी हा प्रचंड जनओघ झाला. यामुळे बाधित लोक विकार त्यांच्या गावात घेऊन गेले. त्या संसर्गावर उपाययोजना नाही. शहरांमध्येच हॉस्पिटल्समध्ये जागा नाहीत, नवीन पेशंटस भरती केले जाऊ शकत नाहीत. खेड्यांमध्ये तर हॉस्पिटल्सची कमी, ICU दूरच. खेड्यांत योग्य औषधे मिळत नाहीत, आहेत ती औषधे साध्या तापावर व

खोकल्यावर, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी नाहीत, कित्येक डॉक्टर्सना कोविदचा पेशंट कसा हाताळायचा हेच माहिती नाही. जवळचे शहर लांब असले तर तेथे पेशंट घेऊन जाणे परवडत नाही. तसेच, खेड्यांत वृद्ध बहुसंख्य असतात. त्यांना आधीच निराळे विकार असतात, कोविदची लस घेतली असेलच असे नाही. अशा परिस्थितीत ज्या औषधांचा उपयोग कोविदवर होतो का हे सिद्ध झालेले नाही अशी औषधे लोकांना देण्यात येत आहेत. उदा. एड्सवरचे एक औषध सरकारने कोविदवर उपाय म्हणून मान्य केले! तसेच चिनी व्हॅक्सिनपेक्षा परदेशी व्हॅक्सिन प्रभावी असूनही ती आयात करणे राजवटीला अमान्य राहिले आहे. तो राष्ट्रीय प्रतिष्ठेचा प्रश्न झाला, लोकांच्या स्वास्थ्याचा नाही.

हेनान या दक्षिण चीनमधील एका गरीब प्रांताची लोकसंख्या १० कोटी. तिथल्या आरोग्यखात्यातील अधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे, ७ डिसेंबरला निर्बंध उठवल्यानंतर दोन आठवड्यातच विकार फैलावला. या प्रांतातील ९ कोटी लोक संसर्गग्रस्त झाले असावेत, म्हणजे ९० टक्के. शांघाय व बीजिंगसारख्या मोठ्या शहरात ७० ते ८० टक्के लोकांना संसर्ग झाला असावा. या शहरांमध्ये कोविदविरोधक परिणामकारक परदेशी औषधांचा काळा बाजार सुरू झाला आहे. ग्रामीण भागात ही औषधे माहीतच नसतात. तसेच शहरे राजकीय महत्त्वाची असल्याने ग्रामीण भागातून वैद्यकीय कर्मचारी तेथे आणले जातात, जेव्हा त्यांची खरी जरूरी ग्रामीण भागात असते.

लोकांची स्मृती अल्प असते पण इतकी अल्प नसते की तीन वर्षांपूर्वी याच सरकारने कोविदची भीती दाखवून त्यांना जेरबंद केले होते. कोविद न जाताच निर्बंध आता का उठवले हा प्रश्न लोक विचारत आहेत. ती भीतीही अजून शाबूत आहे.

राष्ट्रीय स्तरावर चीनमध्ये रोज (निरनिराळ्या अंदाजांनुसार) साडेतीन ते साडेसात कोटी लोक कोविदने बाधित होत आहेत. ही संख्या कोविद सुरू झाला त्या वेळेपेक्षा कित्येक पटींनी जास्त आहे. त्यात omicron हा नवीन वायरस. रोज सुमारे नऊ हजार मृत्यू होत असावेत असा लंडनच्या एका संशोधन संस्थेचा अंदाज आहे. नववर्षाच्या गर्दीमुळे हा आकडा दररोज ३६ हजारच्या वर जाईल. पण सरकार खोटी माहिती देते. कोविदच्या तीन वर्षात साडेपाच हजाराहून कमी मृत्यू झाले, तेही सुरुवातीच्या काळात – असे सरकारी म्हणणे. अधिकृतरीत्या या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात फक्त सात लोक कोविदने दगावले. सॅटेलाइटवरील फोटो स्मशानभूमीच्या बाहेर लागलेल्या रांगा दाखवतात आणि हे खोटे उघड करतात. आपल्याकडे जसा आधी ऑक्सिजनच्या सिलिंडर्सचा मग दहनासाठी लाकडाचा काळा बाजार कोविदच्या काळात झाला होता, तसा प्रकार चीनमध्ये आहे. अंत्यविधीसाठी स्मशानात रांग मोडून आधी जाता यावे यासाठी कर्मचारी मृताच्या नातेवाईकांकडून लाच घेतात. शिवाय,आजवर कोविद टेस्ट्स घेण्यासाठी प्रचंड संख्येने लोक त्या कामावर होते, ते एकदम बेकार झाले. त्यांनी पगारासाठी लस उत्पादक फॅक्टर्यांची, लशींची नासधूस केली, पोलिसांशी संघर्ष सुरू झाले आहेत.

## चिनी सामान्य माणसाच्या या आढाव्यानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारी चित्र पाहू.

निर्बंधांचा जागतिक अर्थव्यवस्थेवरही अनिष्ट परिणाम झाला. उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पुरवठा होणाऱ्या आयात चिनी मालाचा तुटवडा झाला. मग इतर देशांतील अनेक उद्योग अडचणीत आले. जागतिक बाजारात देशाची पत घसरली. जगातील एक–पंचमांश नैसर्गिक तेल, निम्मे तांबे, निम्मे कथिल, निम्मे जस्त व तीन–पंचमांश लोखंडाचे खनिज चीन विकत घेत असे. मागणी कमी झाल्याने जागतिक बाजारात या मालाच्या किंमती कमी झाल्या. त्या आता वाढतील. अनेक परदेशी कंपन्यांनी चीनमध्ये उत्पादन सुरू केले होते. ते कारखाने बंद पडले. कोविदमुळे तीन वर्षे संपूर्ण बंधने आणि आता अचानक मोकळीक यामुळे देशाच्या धोरणस्थिरतेची शंका येते. काही आयातदार आता मेक्सिकोसारख्या इतर देशांकडे वळत आहेत. निर्बंध उठवल्यानंतरचे चित्र अजून स्पष्ट नाही. कामगार आजारपणाने किंवा वृद्ध नातलगांसाठी गावाकडे गेले तर ते परत कामावर येणे कठीण आहे.

एकूण चित्र पहाता पूर्वार्धातील निर्बंध जनहितापेक्षा निरंकुश सत्तेचे प्रदर्शन, जगात बडेजाव करण्यासाठी असावे. त्यात लोकांची मूलत: पर्वा कितपत होती हे प्रश्नचिन्ह आहे. आता तर लोकांना वाऱ्यावर सोडून देण्यात आले आहे. पर्वा दाखवण्याचीही जरूरी नाही. ॠ

www.purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk